Sakal 4/12/2017 Pg No 9

# पुणे मॅरेथॉनवर इथियोपियाचेच वर्चस्व

## पुरुष विभागात गेताचेव बेशा, महिला विभागात तिसासू बासाझिन विजयी

**पुणे, ता. ३ :** अडथळ्यांची शर्यत पार करत रविवारी पार पडलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये इथियोपियाच्या धावपटूंनी अपेक्षित वर्चस्व राखले. पुरुष विभागात गेताचेव बेशा याने २ तास १५ मिनिटे ९ सेकंद अशी वेळ नोंदवत पूर्ण मॅरेथॉन जिंकली. महिलांची अर्धमॅरेथॉन इथियोपियाच्याच तिसासू बासाझिन हिने १ तास १५ मिनिटे ३१ सेकंद अशी वेळ देत जिंकली.

सहभागी धावपटूंची घटलेली संख्या आणि पुण्यातील थंडी लक्षात घेता या वेळी चांगली वेळ मिळण्याचा अंदाज अखेरीस फोलच ठरला. याचवर्षी जानेवारीत झालेल्या मॅरेथॉनमधील वेळही धावपटूंना गाठता आली नाही. सहभागी झालेल्या परदेशी धावपटूंनी अर्धमॅरेथॉनला पसंती दिली. भारतातील अनेक धावपटू पूर्ण मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते. यात बीईजीच्या धावपटूंचे वर्चस्व होते. पहाटे साडेपाच वाजता शर्यतीला सुरवात झाली. त्या वेळी इथियोपिया आणि केनियाचे धावपटू एकत्रच मार्गी होते. कृषी महाविद्यालयाचा टप्पा ओलांडल्यावर खेळाडूंमध्ये अंतर पडण्यास सुरवात झाली होती. त्यानंतर शिवछत्रपती क्रीडानगरीतून स्पर्धक बाहेर पडल्यावर बेशा आणि झेलालेम लेमा दलेमा या दोघांमध्येच अखेरपर्यंत चुरस होती. अर्थात, बेशाने अखेरपर्यंत आपली आघाडी कायम राखली. तब्बल दोन मिनिटांची आघाडी घेत बेशाने सर्वप्रथम अंतिम रेषा गाठली.



गेताचेव बेशा



तिसासू बासाझिन

### भारतीय गटात करण, संपदा सरस

पूर्ण मॅरेथॉनमध्ये भारतीय गटात तीनही धावपटू पुण्याचेच राहिले. करण सिंग २ तास २८ मिनिटे १ सेकंद अशी वेळ देत पहिला आला. त्याने भारतीय गटातील गतविजेता किशोर गवाणेला मागे टाकले. किशोर गवाणेने दुसरा आणि दादासाहेब खिलारेने तिसरा क्रमांक पटकाविला. महिलांच्या अर्धमॅरेथॉनमध्ये संपदा बुचडे हिने बाजी मारली. तिने १ तास २३ मिनिटे ४० सेकंद वेळ दिली. त्यानंतर पुण्याचीच विनया मालुसरे आणि निकिता गोविल यांनी दुसरा, तिसरा क्रमांक मिळविला.

### करंडक आणि पदकेच प्रदान

भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने स्पर्धेस मान्यता नसल्याचे स्पष्ट केल्यामुळे महापालिकेने निधी देण्यास नकार दिला होता. महापौर मुक्ता टिळकही उद्घाटनाऐवजी थेट पारितोषिक वितरणास उपस्थित राहिल्या. तेव्हा पत्रकारांशी संवाद साधला असता त्यांनी स्पर्धेबाबतच्या तांत्रिक बाबी स्पष्ट होत नाहीत, तोवर पालिकेकडून कुठलाही निधी दिला जाणार नाही, हेच स्पष्ट केले. महापालिकेकडून स्पर्धेसाठी ३५ लाख रुपयांचा निधी दिला जाणार होता. त्यामुळे पारितोषिक वितरण सोहळ्यात विजेत्यांना केवळ करंडक आणि पदकेच प्रदान करण्यात आली.

### निकाल

पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी. : २ तास १५ मिनिटे ९ सेकंद) गेताचेव बेशा, झेलालेम लेमा दलेमा, देवजे कसाव (तिन्ही इथियोपिया) अर्धमॅरेथॉन (२१ कि.मी. पुरुष : १ तास २ मिनिटे ३६ सेकंद) मित्कू तफा देकेबा, अबेबे ताफेसे, वाकशुमे बुल्चा (तिघे इथियोपिया), महिला (२१ कि.मी. : १ तास १५ मिनिटे ३१ सेकंद) तिसासू बासाझिन, अगेर बेलेव (दोघी इथियोपिया), पास्कलिया जेपकोजेल (केनिया)